**फॅक्स संदेश**

अतितात्काळ / कालमर्यादा प्रकरण

क्रमांक: पोमसं / ५ /१०/मागणीपत्र-२००९/१/२००९

पोलीस महासंचालक यांचे कार्यालय

शहीद भगत सिंग मार्ग, कुलाबा, मुंबई-४०० ००१

दिनांक- २३.१२.२०१०

**वाचा :** १) शासन परिपत्रक , गृह विभाग क्र. पीएसबी-०३०९ / प्र.क्र.९८१ / पोल-५ अ, दिनांक २/१२/२०१०

२) या कार्यालयाचे परिपत्रक , क्र. पोमसं / ५ /१० / मागणीपत्रक-२००९/२००९ , दिनांक ३/१२/२०१०

३) महाराष्ट्र लोकसेवा आयोग , मुंबई यांचे पत्र क्रमांक १४४२ (क) (वि) (१) /२००९/तीन , दिनांक २१ /१२/२०१०

**शुध्दीपत्रक :-**

उपरोक्त विषयास अनुसरुन सर्व घटक प्रमुखांना कळविण्यात येते की, पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा (पूर्व) परीक्षा-२००९ चा कार्यक्रम महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने निश्चित केला होता. सदर परीक्षेचे अर्ज ऑनलाईन सादर करण्याचा अंतिम दिनांक २२ डिसेंबर , २०१० असा असल्याचे प्रसिध्द करण्यात आले होते. तथापी , महाराष्ट्र लोकसेवा अयोगाद्वारे परीक्षेच्या कार्यक्रमात बदल करण्यात आला असून **सदर परीक्षेचे अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकात ३० डिसेंबर , २०१० पर्यंत वाढ करण्याचा व परीक्षा दिनांक ९ जानेवारी , २०११ ऐवजी रविवार दिनांक २३ जानेवारी , २०११ रोजी घेण्याचा निर्णय घेतला आहे.** आयोगाच्या सूचनेनुसार शासनाने शुध्दीपत्रक गृहविभाग क्र. पीएसबी-०३०९ / प्र.क्र.९८१ / पोल-५ अ, दिनांक २२/१२/२०१० (प्रत संलग्न) अन्वये निर्गमित केले आहे. सदरचे शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१०१२२२१७०६१३००१ असा आहे. तसेच **www.mahapolice.gov.in** या महाराष्ट्र पोलीसांच्या संकेतस्थळावरही **Flash button** अंतर्गत परिपत्रक उपलब्ध आहे.

२. **सर्व घटक प्रमुखांनी विभागीय स्पर्धा परीक्षेची सुधारीत तारीख त्यांच्या अधिपत्याखालील सहायक पोलीस उपनिरीक्षक / पोलीस हवालदार / पोलीस नाईक व पोलीस शिपाई (रजेवर/प्रतिनियुक्तीवर असणा-या कर्मचा-यांसह)** इच्छूक उमेदवारांना उपरोक्त परीक्षेची माहिति ज्ञात होण्यासाठी शासन परिपत्रक त्यांच्या निदर्शनास आणून देण्याची पूर्णत : खबरदारी घेण्यात यावी. जेणेकरुन कोणताही पात्र उमेदवार उपरोक्त संधीपासून वंचित राहणार नाही.

( डॉ. भूषण कुमार उपाध्याय )

विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)

पोलीस महासंचालक यांचे करिता.

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सह)

D:/New Folder/TRAINING-EXM/DDN-2008-270-/270-CANDIDATES

महासंचालक, अ.सी.बी., महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह अग्रेषित)
अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., महाराष्ट्र राज्य, पुणे
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, रा.रा.पो.बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, वाहतूक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, ना.ह.सं., महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, पोलीस बिनतारी संदेश विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे .
विशेष पोलीस महानिरीक्षक , नक्षलविरोधी अभियान, महाराष्ट्र राज्य, नागपूर
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक
विशेष पोलीस महानिरीक्षक, एस.पी.यु., वडाची वाडी, महाराष्ट्र राज्य,पुणे
सर्व पोलीस अधीक्षक (मोटार परिवहन विभाग / बिनतारी संदेश विभाग / लोहमार्ग सह)
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १४
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालये
प्राचार्य, डी.टी.एस., नाशिक

प्रत सादर अग्रेषित :-

महाव्यवस्थापक , पोलीस गृहनिर्माणर व कल्याण महामंडळ , मंबई.

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष , मुंबई

२. पोलीस उप अधिक्षक यांनी कृपया शासन गृहविभाग परिपत्रक क्र. पीएसबी-०३०९ / प्र.क्र.९८१ / पोल-५ अ, दिनांक २२/१२/२०१० हे www.mahapolice.gov.in वेबसाईटवर प्रसिध्द करावे. व ते दि. २३/०१/२०११ पर्यंत वेबसाईटवर उपलब्ध ठेवावे.

D:/New Folder/TRAINING-EXM/DDN-2008-270-/270-CANDIDATES

**अतितात्काळ / समयमर्यादा**
क्रमांक-पीएसबी-०३०९/प्र.क्र.९८१/पोल-५अ

महाराष्ट्र शासन,
गृह विभाग, मंत्रालय,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक :२२ डिसेंबर २०१०.

प्रति,

पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विषय : **पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा (पूर्व) परीक्षा २००९**

संदर्भ : (१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे पत्र क्रमांक-१४४२(क)(वि)(१)/२००९/तीन, दिनांक २१ डिसेंबर २०१०

(२) शासन परिपत्रक, गृह विभाग क्रमांक-पीएसबी-०३०९/प्र.क्र.९८१/पोल-५अ. दिनांक २ डिसेंबर २०१०

उपरोक्त दिनांक २ डिसेंबर २०१० च्या शासन परिपत्रकाच्या अनुषंगाने पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा (पूर्व) परीक्षा-२००९ ही दिनांक ९ जानेवारी २०११ रोजी घेण्यात येणार असल्याचे तसेच सदर परीक्षेचे अर्ज ऑनलाईन सादर करण्याचा अंतिम दिनांक २२ डिसेंबर २०१० असा असल्याचे प्रसिध्द करण्यात आले होते. तथापि प्रस्तुत परीक्षेस अर्ज करू इच्छिणा-या ब-याच कर्मचाऱ्यांची विधानमंडळाच्या नागपूर अधिवेशनाच्या बंदोबस्तासाठी नेमणूक झालेली होती. त्यामुळे त्यांना परीक्षेची पूर्व तयारी करण्यासाठी व विहित कालमर्यादेत अर्ज सादर करण्यासाठी अपुरा कालावधी उपलब्ध होत होता. त्यामुळे अशा कर्मचाऱ्यांनी आयोगास प्रस्तुत परीक्षा पुढे ढकलण्याची व अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकात वाढ करण्याची विनंती केली होती. आयोगाने उमेदवारांच्या उपरोक्त विनंतीचा सहानुभूतीपूर्वक विचार करून सदर परीक्षेचे अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकात **३० डिसेंबर २०१०** पर्यंत वाढ करण्याचा व परीक्षा दिनांक ९ जानेवारी ऐवजी **रविवार दिनांक २३ जानेवारी २०११** रोजी घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार उमेदवारांनी प्रस्तुत परीक्षेचे वेब-बेस्ड (Web-Based) अर्ज संदर्भाधीन क्रमांक-२, दिनांक २ डिसेंबर २०१० च्या शासन परिपत्रकान्वये विहित केल्यानुसार **दिनांक ३० डिसेंबर २०१० रोजी २३.५९** वाजेपर्यंत सादर करणे आवश्यक आहे. हा बदल परीक्षेस अर्ज करू इच्छिणाऱ्या महाराष्ट्र पोलीस दलातील सहायक पोलीस उपनिरीक्षक / पोलीस हवालदार / पोलीस नाईक व पोलीस शिपाई यांच्या निदर्शनास आणण्यासाठी आवश्यक शासन शुध्दीपत्र निर्गमित करण्यात आले आहे. त्याची प्रत सोबत जोडली आहे.

२. सर्व इच्छुक उमेदवारांना उपरोक्त परीक्षेची माहिती ज्ञात होण्यासाठी शासन परिपत्रक व शासन शुद्धीपत्र त्यांच्या निदर्शनास आणून देण्याची पूर्णतः खबरदारी घेण्यात यावी, जेणे करुन कोणताही उमेदवार परीक्षेपासून वंचित राहणार नाही. त्यासाठी सदर परिपत्रक पोलीस वेबसाईटवर प्रसिद्ध करावे व बिनतारी संदेशाव्दारे सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणण्यात यावे, ही विनंती.

( सदानंद जाधव )
**शासनाचे उपसचिव, गृह विभाग.**

सहपत्र : वरीलप्रमाणे.

८३

महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक / पोलीस हवालदार / पोलीस नाईक व पोलीस शिपाई यांच्याकरिता पोलीस उपनिरीक्षक पदावर नियुक्तीसाठी मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा - २००९.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग,
शासन शुद्धीपत्र क्रमांक- पीएसबी-०३०९/प्र.क्र.९८१/पोल-५अ
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २२ डिसेंबर २०१०.

वाचा : (१) शासन परिपत्रक, गृह विभाग क्रमांक- पीएसबी-०३०९/प्र.क्र.९८१/पोल-५अ, दिनांक २ डिसेंबर २०१०.
(२) महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई यांचे पत्र क्रमांक-क्रमांक-१४४२(क)(वि)(१)/२००९/तीन, दिनांक २१ डिसेंबर २०१०

**शासन शुद्धीपत्र :**

उपरोक्त संदर्भाधीन शासन परिपत्रकातील दुसऱ्या ओळीतील "(पूर्व) परीक्षा २००९ महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत रविवार दिनांक ९ जानेवारी २०११ रोजी" ऐवजी "(पूर्व) परीक्षा २००९ महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत रविवार दिनांक २३ जानेवारी २०११ रोजी" आणि शासन परिपत्रकासमवेतच्या परिशिष्ट-अ च्या परिच्छेद-१ मधील सहाव्या ओळीतील "दिनांक ९ जानेवारी २०११ रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येईल" ऐवजी "दिनांक २३ जानेवारी २०११ रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येईल"असे व परिच्छेद-५(५.२) मधील दुसऱ्या ओळीतील "वेबसाईटव्दारे दिनांक २ डिसेंबर २०१० ते दिनांक २२ डिसेंबर २०१० या कालावधीत सादर करणे आवश्यक राहिल" या ऐवजी "वेबसाईटव्दारे दिनांक २ डिसेंबर २०१० ते दिनांक ३० डिसेंबर २०१० या कालावधीत सादर करणे आवश्यक राहिल. उमेदवारांनी प्रस्तुत परीक्षेचे वेब-बेस्ड (Web-Based) अर्ज संदर्भाधीन क्रमांक-२, दिनांक २ डिसेंबर २०१० च्या शासन परिपत्रकात विहित केल्यानुसार दिनांक ३० डिसेंबर २०१० रोजी २३.५९ वाजेपर्यंत सादर करणे आवश्यक आहे" असे वाचण्यात यावे.

हे शासन शुद्धीपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून, त्याचा संगणक सांकेतांक २०१०१२२२१५०६१३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( सदानंद जाधव )
शासनाचे उपसचिव, गृह विभाग.

प्रति,

१) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने)*.
२) महासंचालक व पोलीस महानिरीक्षक , महाराष्ट्र राज्य, मुंबई
३) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
४) संचालक , ॲन्टी करप्शन ब्युरो, मुंबई.
५) अप्पर पोलीस महासंचालक, गुन्हा अन्वेषण विभाग (गुन्हे), पुणे
६) आयुक्त, गुन्हा अन्वेषण विभाग (गुप्तवार्ता), मुंबई.
७) अपर पोलीस महासंचालक, (प्रशिक्षण व खास पथके ), मुंबई.
८) विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, मुंबई.
९) सर्व पोलीस उपमहानिरीक्षक.
१०) सर्व पोलीस अधीक्षक .
११) सर्व पोलीस आयुक्त, (मुंबई वगळून).